PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Tujhi majhi jamli jodi
Year: 1990

Song: Javal javal ashi ye
Lyricist: Vilas, Pravin Davane

जवळ जवळ जवळ अशी ये
गोमू लाजू नको
नगं रं नगं रं नगं रं नगं रे
मला ओढू नको
बघ लाटांचा झोका हा झुलला
कसा आभाळी जाऊन भिडला
येडया पिरतीला साजण भुलला
नगं म्हणताना जीव कसा जडला
जडला जडला जडला
जवळ जवळ जवळ अशी ये
गोमू लाजू नको
नगं रं नगं रं नगं रं नगं रे
मला ओढू नको

जाऊ माडामंदी
गं येऊ लाडामंदी
सुटलाया तुफानी वारा
मन मासोळीचं
गं जाळयातून नाचं
त्यात लाटांचा मारा
दूर नको जाऊ
गं असं नको पाहू
कशाला रूपाचा तोरा
झुलतेय होडी गं पिरतीची गोडी
ज्वानी आली भराला
नवतीचा हा शिणगार गं
हळदीच्या रंगात भुलून
फुलून सजून अशी ये
गोमू लाजू नको
नगं रं नगं रं नगं रं नगं रे
मला ओढू नको

खोल पाण्यामधी
रं दोघं आलो कधी
दूर गेलाय किनारा
आत पाण्यामंदी
गं हात हातामंदी
तूच आता निवारा
नको छेडू असं
रं तुला सांगू कसं
होईल बोभाटा सारा
लाज गालावरी
गं बोल आता तरी
उगी छळशी कशाला
सांगू कशी पडले फशी
तोरण दारात सनई जोरात
घेऊनी वरात ये
मला ओढू नको
जवळ जवळ जवळ अशी ये
गोमू लाजू नको
बघ लाटांचा झोका हा झुलला
कसा आभाळी जाऊन भिडला
येडया पिरतीला साजण भुलला
नगं म्हणताना जीव कसा जडला
जडला जडला जडला
जवळ जवळ जवळ अशी ये
गोमू लाजू नको
नगं रं नगं रं नगं रं नगं रे
मला ओढू नको

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*